माहितीचा अधिकार

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
संचालनालय, लेखा व कोषागारे
नविन शासकीय कुटीर क्रमांक १५ व १६, प्लॉट क्रमांक १७६,
फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई ४०० ०२१.
दुरध्वनी क्रमांक ०२२-२२०२२४७५
फॅक्स क्रमांक ०२२-२२०२५२७९ संकेतस्थळ- www.mahakosh.in

---

क्रमांक : संलेको/परीक्षा/गुणफेरतपासणी शुल्क/२०१२/ ३०४ दिनांक :- 18 DEC 2012

-: परिपत्रक :-

विषय :- सेवा प्रवेशोत्तर परीक्षा, महाराष्ट्र लेखा लिपिक परिक्षा व महाराष्ट्र लेखा व स्थानिक निधी लेखां गट क सेवा विभागीय परीक्षा नियम २०१२ अन्वये भाग १ व भाग २ गुणफेर तपासणीकरीता प्रती विषय शुल्क रुपये १००/- आकारणेबाबत

संचालनालयाकडून सेवा प्रवेशोत्तर परीक्षा, महाराष्ट्र लेखा लिपिक परिक्षा तसेच दिनांक ३/३/२०१२ च्या नवीन अधिसूचनेनुसार महाराष्ट्र लेखा व स्थानिक निधी लेखा गट क सेवा विभागीय परीक्षा नियम २०१२ अन्वये भाग १ व भाग २ याप्रमाणे परीक्षा घेण्यात येतात.

सदर परीक्षेत जे उमेदवार नापास झाले आहेत किंवा एखाद्या विषयात कमी गुण मिळाले आहेत असे उमेदवार गुणफेरपडताळणी करीता अर्ज सादर करतात. त्याप्रमाणे प्रत्येक परीक्षेनंतर ज्यांनी गुणफेरपडताळणीसाठी अर्ज सादर केला आहे आणि जे गुणफेरपडताळणीमध्ये उत्तीर्ण झाले आहे अशा उमेदवारांच्या नावांची यादीसह अधिसूचना जारी केली जाते.

सदर प्रक्रिया विनाशुल्क होत असल्यामुळे काही प्रकरणात असे आढळून आले आहे की, काही उमेदवार विनाकारण फारच कमी गुण असलेतरी गुणफेरपडताळणी करीता अर्ज सादर करतात. सदर गुणफेरपडताळणीच्या या सर्व प्रकियेमध्ये शासनाचा भरपूर वेळ व लेखन सामुग्री खर्ची पडते त्याच्या खर्चापोटी गुणफेरपडताळणीसाठी रु. १००/- प्रति विषय शुल्क आकारण्यात येत आहे.

या परिपत्रकाव्दारे सर्व परीक्षार्थ्यांना कळविण्यात येते की, माहे ऑक्टोबर/नोव्हेंबर-२०१२ मध्ये झालेल्या परीक्षेचे तसेच ह्यापुढे होणाऱ्या सर्व परीक्षांचे उमेदवारांकडून गुणफेरतपासणीसाठी

माहितीचा अधिकार

"ACCOUNTS OFFICER (O. & M. O.) DAT, MUMBAI" यांच्या नांवे बँकेतून काढलेला प्रति विषय रुपये १००/- चा धनाकर्ष, अथवा संचालनालय, लेखा व कोषागारे यांचे अधिनस्त असलेले सर्व विभागीय कार्यालय, अथवा जिल्हा कोषागार कार्यालय, अथवा अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई येथे रोखीने रुपये १००/- प्रति विषय भरुन त्याची मुळ पावती जोडून गुणपत्रिका निर्गमित करण्याच्या दिनांकापासून साधारणत: एका महिन्याच्या आत अर्ज करावा. व अर्जात परीक्षेचा बैठक क्रमांक, धनाकर्ष क्रमांक, पावर्ती क्रमांक व पडताळणीचा विषय नमूद करावा, याची सर्व परीक्षार्थ्यांनी नोंद घ्यावी.

(शिलानाथ जाधव)
संचालक, लेखा व कोषागारे,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत सस्नेह रवाना:-
मा. संचालक, स्थानिक निधी संचालनालय, कोकण भवन, नवी मुंबई.
प्रत :-

१. सहसंचालक (प्रशासन), संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई.
२. सहसंचालक (कोषागारे), संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबइ
३. सहसंचालक, लेखा व कोषागारे, (सर्व विभाग)
४. सहसंचालक, स्थानिक निधी लेखा कार्यालय (सर्व विभाग)
५. अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे (पूर्व) मुंबई
६. वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई.
७. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व),
८. जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व),
९. सहाय्यक संचालक (प्रशिक्षण), विभागीय प्रशिक्षण केंद्र, (सर्व)
१०. संबंधीत विभागाचे कार्यालय प्रमुख
११. लेखा अधिकारी, (रचना व कार्यपध्दती), मुख्यानय, मुंबई.
१२. रोख शाखा, मुख्यालय, मुंबई.
१३. संबंधीत कर्मचारी.

136/नोंशा
354/परीक्षा
8/2/13

संचालनालय, लेखा व
महाराष्ट्र राज्य, मुंबई
- 6 FEB 2013
प्राप्त झाले सही.....

**महाराष्ट्र शासन**

क्रमांक- सेवाप्र २०१३/प्र.क्र.४ /कोषा.प्रशा.३
वित्त विभाग,मंत्रालय,
मुंबई- ४०० ०३२,
दिनांक :- ०४ फेब्रुवारी, २०१३.

प्रति,

संचालक,
लेखा व कोषागारे,
मुंबई.

विषय : विभागीय परीक्षेतील गुणफेर तपासणी करीता रु.१००/- शुल्क आकारणेबाबत.

परीक्षा

संदर्भ : आपले क्र.परीक्षा १७-२०१२/गुणफेर तपासणी शुल्क/ ३०५/८७५७, दि.१८/१२/२०१२.

महोदय,

उपरोक्त विषयाबाबतच्या संदर्भाधीन पत्रास अनुसरुन कळविण्यात येते की, संचालनालयाकडून घेतल्या जाणा-या सेवा प्रवेश परीक्षा, महाराष्ट्र लेखा लिपिक परिक्षा तसेच दि.०३/०३/१२ च्या अधिसूचनेनुसार महाराष्ट्र लेखा व स्थानिक निधी लेखा गट क सेवा प्रवेश विभागीय परीक्षा नियम २०१२ अन्वये घेतली जाणारी भाग १ व २ परीक्षा मधील उमेदवारांकडून गुणफेरतपासणीसाठी रु.१००/- इतके शुल्क आकारण्यास मान्यता देण्यात येत आहे.

आपला,

(स. ह. भोसले)
कक्ष अधिकारी, वित्त विभाग.